लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या प्राथमिक स्तरावरील विध्यार्थ्यांच्या बोलीभाषा व प्रमाणभाषांच्या भाषिकक्षमतांचा तुलनात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाच्या अंतरविदयाशाखा अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीच्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

ठाकुर संतोष अर्जुनराव

मार्गदर्शक

डॉ.मुगळे दिलीप मनोहरराव

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

जुलै - 2019

लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बोलीभाषा व प्रमाणभाषाच्या भाषिक क्षमतांचा तुलनात्मक अभ्यास

प्रास्ताविक :-

प्रत्येक मेंदू असलेल्या मानवाचे मूल शिकु, समजु शकते फक्त गरज आहे त्या बालकाला पोषक, पूरक वातावरणाची असे वातावरण जिथे मुलाला आंनद, सन्मान मिळेल, ते भयमुक्त पणे बोलू, वावरू शकतो. तिथे त्यांच्या भाषेचा,संस्कृतीचा सन्मान केला जात असेल. म्हणजेच आपलेपणाची, आपुलकीची वागणूक जिथे त्या विद्यार्थ्यांना मिळेल तिथेच ते स्वच्छंदी शिकतं….!

परंतु त्याच्या शिकण्यात जर भाषा अडचणीची ठरत असली तर त्याची भाषेची अडचण आपण शिक्षकांनी दुर करायलाच हवी. यासाठी सर्वात प्रथम आपल्याला त्या विद्यार्थ्यासोबत मैत्री करून त्याला शिकते करायचे असल्यास त्याची बोलीभाषा आपल्याला शिकुन घेणे आवश्यक आहे. प्रथमत: बोलीभाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे संपुर्ण अध्ययन अनुभव त्याच्याच बोलीभाषेतून व्हायला हवे असे संशोधन सांगते. भाषा स्व-अभिव्यक्तेद्वारे भाव-भावनांना व्यक्त करण्याचे माध्यम, भाषेद्वारेच मुल स्वत:च्या भाव-भावना, विचार, ज्ञान व्यक्त करतो. ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण भाषेद्वारे झालेले आपल्याला दिसून येते. भाषा हिच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक असते. कोठारी आयोगाच्या शिफारसीनुसार प्रत्येक बालकाला मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे. भाषिक समस्येमुळे मुल शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर राहू नये. शाळा बाहय होवू नये यासाठी बोलीभाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत नियोजनापूर्व, व अभ्यासपुर्ण प्रयत्न, पध्दती निर्माण राबवावी लागेल यामुळे दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी प्रभावी ठरेल यांच्यातील अंतर संबंध व बाह्य जगाशी संबंध जोडून घ्यायला सक्षम बनवितात.

भाषा ग्रहण करण्याची क्षमता मुलांमध्ये जन्मत:च असते रोजच्या अनुभवातून आपल्याला हे कळते कि बहुतेक मुलांनी शाळेत येण्या अगोदरच भाषा नावाची अतिशय गुंतागुंतीची व नियमांनी बध्द अशी संरचना आत्मसात केलेली असते त्यासाठीची भाषिक क्षमता त्यांच्याकडे असते.

शिक्षण प्रवाहात सामील झालेल्या, होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, भाषिक पार्श्वभुमीत फार मोठया प्रमाणावर भिन्नता आहे. परंतु शालेय अभ्यासक्रमांची आखणी मात्र समान सुरूवात आणि समान अंतिम ध्येय अशा प्रकारे केल्याचे दिसते. शिक्षणाची सर्वसाधारण अंतिम ध्येये समान असली, इतकेच नव्हे तर इयत्तानिहाय उद्दिष्टये आणि अध्ययन निष्पत्ती ही समान ठेवण्यात आली, तरी त्याकडे वाटचाल करणारी मुले वेगवेगळया आंरभबिंदुपासून सुरूवात करतात ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे उद्दिष्टे जरी समान असली तरी त्यातून शिक्षणप्रक्रियेत समानता येत नाही. शिक्षण प्रवाहात सामील होणाऱ्या सर्व मुलांची शैक्षणिक, भाषिक,सामाजिक पार्श्वभूमी काय आहे. याचा शैक्षणिक दृष्टया अभ्यास करून त्यांच्या गरजा तपशीलवारपणे नोंदवल्या पाहिजेत. या गरजांची निश्चिती करत असताना त्यात समाजाचा, विद्यार्थ्यांचा, आणि पालकांचाही समावेश असला पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा नेमकेपणाने दिसून येतील व त्यानुसार अभ्यासक्रमांची लवचीक आणि कालसुसंगत अशी रचना करता येईल.

संशोधनाचे महत्व्:-

प्रस्तुत संशोधन हे बोलीभाषा प्रभावित क्षेत्रातील मुलांच्या शिकण्यातील गतीचा योग्यरित्या मागोवा घेण्यासाठी आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे प्रमाणभाषेच्या माध्यमातून झालेले आपणाला दिसून येते. यामुळे प्राथ. शिक्षणातील सर्व क्रमिक पाठ्यपुस्तके प्रमाणभाषेतच असल्याचे आपणास दिसून येतात.

प्रत्यक्षात महाराष्ट्र हे राज्य भाषिक वैविध्याचा प्रदेश आहे. याठिकाणी सामाजिक,आर्थिक, भाषिक इ. विविध वैविध्याचा समुदाय आहे. या सर्व वैविध्येतेला आपण प्रमाणभाषेत एकत्रित करू शकत नाही.

सद्यस्थितीत भाषा वैविध्य असलेल्या परिसरात प्रमाणभाषेतुनच अध्ययन- अध्यापनाचा आग्रह आपणाला दिसून येतो. यामुळे स्थानिक बोलीभाषेचा व प्रमाणभाषेचा योग्य समायोजन, समन्वय न झाल्यामुळे मुलांच्या भाषिक कौशल्यांची, क्षमता प्राप्तीची गती कमी आहे. याचा परिणाम मुले अध्ययन-निष्पत्तीत मागे दिसून येतात.

प्रस्तुत संशोधनामध्ये मुलांच्या शिकण्यातील अडथळा दुर होवून बोलीभाषा ते प्रमाणभाषा असा क्रमित प्रवास सुरू होतो.

बोलीभाषा ते प्रमाणभाषा या वर्गातील अंतरक्रियामुळे मुल स्वत: ज्ञानाची रचना करू शकेल परिसरातील उपलब्ध अनुभवांची सांगड अध्ययनातील घटकांशी करून त्याचे अभिव्यक्ती कौशल्य विकसित होईल. या सोबतच मुलांची अध्ययन कक्षा अधिक प्रगत होऊन मुलांची गुणवत्ता वाढीस लागेल. शिक्षक अध्यापन प्रक्रिया शिक्षक अथवा पाठयपुस्तक केंद्रित न राहता बालक स्नेही होईल.या सर्वांचा परिणाम मुलांच्या सर्वागिक वाढीसाठी व व्यक्तीमत्व विकासासाठी उपयुक्त असेल.

संशोधनाची गरज :

लातूर जिल्हयाचा विचार करता या जिल्हयात विविध बोलीभाषा असणारा समुदाय खुप मोठया प्रमाणात वास्तव्यास आहे. तसेच भाषिक वैविध्य खुप मोठया प्रमाणात दिसुन येते.

उदा :- बंजारा, तेलगू, कन्नड, वडार, हिंदी, मराठी, राजस्थानी औद्योगिकरणामुळे स्थलांतरित लोकसंख्या आढळून येते.

या सर्व भाषांचे वैविध्य असणाऱ्या मुलांना मात्र प्रमाणभाषेतून अध्ययन-अध्यापन आंतरक्रिया झालेल्या दिसून येतात.

लातूर **जिल्ह्याचा गुणवत्ता निर्देशांक खालीलप्रमाणे**

	भाषा	गणित
ASER 2018	58.9	49.7
NAS 2017	58.15	56.17
DIET latur	61.2	57.7

इतक्या निम्न स्तरावर गुणवत्ता दिसुन येते. याचा अर्थ असा कि मुलांच्या भाषिक कौशल्यांचा विकास न होणे हा सर्वात मोठा अडथळा ठरत आहे. बोलीभाषा ही समस्या नसुन या वैशिष्टयांची एक प्रभावी संसाधन म्हणून वापर व्हावा. बोलीभाषा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासातील प्रमुख घटक आहे. भाषा हा शिक्षणाचा पाया आहे. भाषेच्या आधारेच ज्ञानाची रचना केली जाते. विद्यार्थ्यांची संवादाची व आकलनाची क्षमता भाषेमुळेच समृद्ध बनते. शिक्षणाची अंतिम ध्येय्य् समान असली तरी विद्यार्थी वेगवेगळया आरंभबिंदूपासून सुरूवात करणारी असतात. विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक गरजांची वयानुरूप पुर्ती होईल अशा प्रकारे अभ्यासक्रमाचा आशय व अध्ययन पध्दतीची निश्चिती करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत बौद्धिक, भावनिक व शारीरिक जडणघडणीसाठी आवश्यक ते अध्ययन अनुभव त्याला मातृभाषेतून मिळाले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या घरातील भाषेला शिक्षण व्यवहारातील, तसेच शाळेतील माध्यमभाषेत सहजतेने प्रवेश करता यावा. विद्यार्थ्यांना स्वसामर्थ्याची ओळख होण्यासाठी सदरील संशोधनाची गरज आहे. बोलीभाषेच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थी शाळाबाह्य होवू नयेत.मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याच्या अनुषंगाने मराठीच्या बोलीभाषा व पोटभाषा बोलणाऱ्या मुलांच्या घरातील भाषेला विशेषत: प्राथमिक स्तरावर वर्ग – अध्यापनात व वेळापत्रकात स्थान द्यावे.

तसेच विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तर प्रगत होऊन वर्गनिहाय अध्ययन निष्पत्ती मुले साध्य करू शकतील.

समस्या विधान :-

लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बोलीभाषा व प्रमाणभाषाच्या भाषिक क्षमतांचा तुलनात्मक अभ्यास

समस्या स्पष्टीकरण :-

1. मुलांना जिथे महत्व दिले जाते. प्रत्येक मुलांसाठी त्याचे घर, कुटुंब, भाषा, स्थान महत्वाचे असते. परंतु शिक्षण प्रक्रिया पुर्ण: प्रमाणभाषेतून पुर्ण होत असते. अशावेळी मातृभाषा /बोलीभाषा विभिन्न् असलेली मुल शाळेत समायोजन करू शकत नाही. परिणामी ते शाळाबाह्य होते.
2. भाषा हे संवादाचे, स्वताच्या भावना, कल्पना व विचार व अभिव्यक्ती करण्याचे एक सशक्त साधन आहे. जन्मापासुन मुले घर आणि परिसरातून जी भाषा निसर्गत: आत्मसात करतात ती भाषा जर शिक्षणाचे माध्यम ठरली तर शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्र् मोठया प्रमाणात नियंत्रित होण्याची शक्यता आहे.
3. जिल्हयातील पाठयपुस्तके संदर्भसाहित्य, शै.साहित्य्, नवोपक्रम, अध्ययन-अध्यापन पध्दती व प्रमाणभाषेतून संवाद साधण्याचा अधिक कल दिसून येतो. मुलांच्या विचारांशी व अस्मितेशी भाषा इतकी घनिष्ठपणे जोडलेली असते की, मातृभाषेस नकार देणे व ती पुसून टाकणे हे बालकांच्या स्व् जाणीवेत अडथळा ठरू शकते.
4. बहुभाषिकता ही मुलांच्या अस्मितेचा अंगभुत भाग आहे. याशिवाय प्रत्येक मुलाला सुरक्षिततेची आणि आपलेपणाची भावना निर्माण होणार नाही. आणि भाषेमुळे आपण मागे पडत आहोत किंवा वेगळे आहोत हि भावना बळावत राहणार.
5. विद्यार्थ्यांच्या भाषिक, व्यक्तीमत्व् विकासातील ही **महत्वाची** अडचण ठरत आहे.

कार्यात्मक व्याख्या :-

1 **लातूर** :
महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील महसूली जिल्ह्याचे
ठिकाण यात १० तालुके आहेत

2 बंजारा :
प्राचीन काला पासून व्यापारा निमित्त व स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी भटकंती करणारा समुदाय.

3 **प्राथमिक स्तर** :

१९८६ च्या आकृती बंधा नुसार ईयत्ता१ ते ५ वी चे वर्ग म्हणजे प्राथमिक स्तर

4 प्रमाण भाषा :

एक भाषिक समाजातील सर्व व्यक्तींना बव्व्हशी समजली जाणारी **,** समाजातील शिश्त लोकांनी लेखनासाठी मान्य केलेली भाषा म्हणजे प्रमाण भाषा होय.

5)बोलीभाषा :-
व्याकरण विरहित व मर्यादित प्रभावक्षेत्र असलेली विशिष्ट समुदायाची
संवादाचे माध्यम म्हणजे बोली भाषा होय

6)**भाषिक क्षमता :-**
श्रवण, भाषण, वाचन, लेखन यामधील प्राविण्य.

7)**तुलनात्मक** :
दोन भाषा किंवा घटकामध्ये दोन परिस्थिवरील केलेला अभ्यास

संकल्पनात्मक व्याख्या :-

बोलीभाषा ते प्रमाणभाषा या अध्ययन –अध्यापन पध्दतीची नियमित पडताळणी करून शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी गरजाधिष्ठीत कृती कार्यक्रमाची आखणी करणे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1) बोलीभाषा प्रभाव क्षेत्रातील प्राथ. स्तरातील विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा स्तर शोधणे.

2) बोलीभाषा प्रभाव क्षेत्रातील विदयार्थ्यांच्या भाषा विषयक अध्ययन निष्पत्तीचा शोध घेणे.

3) भाषा विषयक क्षमता व अध्ययन निष्पत्ती प्राप्त होण्यासाठी कृती कार्यक्रमाची निर्मिती करणे.

4) शालेय स्तरावर बोलीभाषा – प्रमाणभाषा आंतरक्रिया तून भाषा क्षमता समृद्धीसाठी सहशालेय उपक्रमाची मांडणी/ निर्मिती करणे.

5) कृती कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर व अध्ययन निष्पत्ती वर होणारा परिणाम लिंग, रहिवास या चलांच्या संदर्भात अभ्यासणे.

6) बोलीभाषा प्रमाणभाषा समृध्द संदर्भ साहित्य विकसित करणे.

गृहितके:-

1. सर्व विषयांची पाठयपुस्तके प्रमाणभाषेतून उपलब्ध असल्यामुळे शिक्षकांची अध्ययन-अध्यापन पध्दती हि प्रमाणभाषेला अनुसरून असते.
2. प्रमाणभाषा-बोलीभाषा यातील अंतरामुळे बोली भाषा असणारी मुले व शाळा यामधील अंतर निर्माण होत आहे.
3. भाषिक समस्येमुळे शाळेतील गळतीचा दर खुप प्रमाणात दिसून येत आहे.(स्त्रोत U-DISE)
4. बोलीभाषेच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत वापरामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल. परिणामी त्यांचे शिकणे सुकर होईल.
5. बोलीभाषा प्रभाव क्षेत्रातील विद्यार्थ्यांची संपादणूक कमी आहे.

संशोधनाची परिकल्पना :-

कृती कार्यक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर, अध्ययन निष्पत्तीवर लिंग, रहिवास, या चलांच्या संदर्भाने होणाऱ्या परिणामात सार्थक फरक नाही.

संशोधनाची व्याप्ती :-

1. प्रस्तुत संशोधन प्राथ स्तर 1 ते 5 इयत्तापर्यंत विद्यार्थ्यांसाठी आहे.
2. प्रस्तुत संशोधन शैक्षणिक वर्ष 2019-20 ते 2023-24 या कालावधीतील असेल.
3. प्रस्तुत संशोधन प्राथमिक स्तर भाषा विषयक अध्ययन निष्पत्ती विषयक आहे.
4. प्रस्तुत संशोधन बोलीभाषा प्रभाव क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या संदर्भात आहे.
5. प्रस्तुत संशोधन बोलीभाषा प्रभाव क्षेत्रातील शहरी व ग्रामीण क्षेत्राचा समावेश केला आहे.

संशोधनाची मर्यादा:-

1. प्रस्तुत संशोधन बोलीभाषा प्रभाव क्षेत्रापुरते मर्यादीत आहे.
2. प्रस्तुत संशोधन प्राथ. स्तर 1 ते 5 (ग्रामीण 02 / शहरी 02) शाळा पुरते मर्यादित आहे.
3. प्रस्तुत संशोधन प्राथमिक स्तरावरील भाषिक अध्ययन निष्पत्तीविषयक मर्यादीत आहे.

संशोधनाची जनसंख्या :-

प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या ही बोलीभाषा प्रभाव क्षेत्रातील 1 ते 5 इयत्तेपर्यंत सर्व विद्यार्थी संख्या असतील.

न्यादर्श :-

लातूर जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील 100 विद्यार्थ्यांपुरते (ग्रामीण 50, शहरी 50) आहे.

माहिती संकलनाची साधने:-

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलनासाठी प्रश्नावली, पदनिश्चयन श्रेणी, पडताळासुची, शिक्षक प्रतिक्रिया शोधिका या साधनांचा वापर करणार आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर करणार आहेत.

1. सर्वेक्षण
2. प्रायोगिक पध्दती

संख्या शास्त्रीय तंत्रे- शेकडेवारी, T-Test, x^2

अभिकल्प :-

प्रस्तुत संशोधनासाठी एकल गट पुर्वोत्तर चाचणी अभिकल्पाचा उपयोग करण्यात येत आहे.

चल :-

1) आश्रित चल (परतंत्र चल) Depending Variables:- संपादणूक, अध्ययन निष्पत्ती, भाषिक क्षमता.
2) स्वतंत्र चल Independing Variables:- कृती कार्यक्रम, ग्रामिण, शहरी, लिंग.

संशोधन वेळापत्रक :-

अ.क्र.	तपशिल	कालावधी
1	संदर्भ साहित्य वाचन	ऑगस्ट 2019 ते डिसेंबर 2019
2	संशोधन आराखडा दुरूस्ती	जाने 2020
3	अध्ययन स्तर निश्चिती	फेब्रु-मार्च -2020

4	अध्ययन निष्पत्ती तपासणी	एप्रिल -2020
5	कृतिकार्यक्रम निर्मिती	मे ते जुलै – 2020
6	कृतिकार्यक्रम-अंमलबजावणी	ऑगस्ट-सप्टेंबर -2020
7	प्रकरण लेखन	ऑक्टो-2020 फेब्रु-2021
8	संदर्भ साहित्य वाचन	मार्च –मे 2021
9	प्रकरण लेखन	एप्रिल-जून 2021
10	प्रकरण लेखन दुरूस्ती	जुलै-ऑगस्ट -2021
11	प्रकरण अंतिमिकरण	सप्टे- डिंसे- 2021

संशोधनाचे अंदाजपत्रक :-

अ.क्र.	तपशिल	अपेक्षित खर्च
1	आराखडा निर्मिती	500
2	पुस्तक खरेदी	5000
3	साधन निर्मिती	5000
4	प्रवास खर्च	10000
5	टपाल खर्च	1000
6	अहवाल लेखन	20000
7	अहवाल बांधणी	2000
8	इतर खर्च	5000
	एकुण खर्च	**48000**

संदर्भ :-

1. RTE 2009
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -1986
3. NCF - 2005
4. PSM- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र
5. NCFTE – 2009.
6. अध्ययन अक्षमता – मनोरमा प्रकाशन,पुणे.
7. बहुरंगी बुद्धिमत्ता – डॉ.श्रुती पानसे
8. डोक्यात डोकवा – डॉ.श्रुती पानसे
9. कवाडे उघडतात – प्रतिभा भराडे
10. ज्ञानरचनावाद – प्रतिभा भराडे, नामदेव माळी

11 बोली भाषा संशोधनाच्या नव्या दिशा ---- म. सु पगारे

संशोधक

ठाकुर संतोष अर्जुनराव

मार्गदर्शक

डॉ.मुगळे दिलीप मनोहरराव

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड